<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.   १६</u>

<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>
**सरकार विरूध्द सुरेश**
**निशाणी – ९६**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**माझे नाव – अजबसिंग हिरालाल जाडवार**
**वय – अंदाजे ४८ वर्ष, व्यवसाय – सहा. आयुक्त राज्य गुप्त वार्ता विभाग**
**राहणार – संभाजी नगर.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी श्रीमती जी. ओ. वर्मा यांच्या कडून**

दि.०३.१२.२०१३ रोजी मी नागपूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाख मध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. अपराध क्र. १४६/२०१५ हा भादवी कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४७७ (अ) प्रमाणे दाखल होता त्यामध्ये एकाच रस्त्याचे बांधकामाबाबत दोन वेळा रक्कम उचल्ल्याची तक्रार होती. मला दि ०९.१२.२०१५ रोजी सदर गुन्हयाचा तपास मिळाला होता. मला तो आदेश दाखविला तो तोच आहे. त्यावर पोलिस अधिक्षक यांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ९७</u>** देण्यात येते. फिर्यादी नगर परिषदेचे मुख्याधिकारी होते त्यांनी फिर्याद देण्यापूर्वी झालेल्या गुन्हयाबाबत त्यांच्या विभागात अगोदरच चौकशी केली होती त्याचा अहवाल फिर्यादीसोबत दिला होता. मला आता तो अहवाल दाखविला, तो तोच आहे. सदरचे कागदपत्र पान क्र. १३ ते ३१ वर आहे. त्यांना ओळखीसाठी एकत्रात **<u>आर्टिकल–अ</u>** देण्यात येते. दि. ०५.०१.२०१६ रोजी मुख्याधिकारी यांना पत्र देउन रस्त्याबाबतचे कागदपत्र जसे की एम.बी., करारपत्र, बिले, काम पुर्णत्वाचा दाखला, नोटशीट, वर्क आर्डर, आरोपी क्र. ३ यांना नगर परिषदेने दिलेले वर्क ऑर्डर तयार करण्यासाठीचा आदेश असे मुळ कागदपत्र मागितले. ते पत्र मला दाखविले, ते तेच आहे, त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ९८</u>** देण्यात येते. त्यानंतर नगर परिषदेने त्यांच्या कव्हरिंग लेटरसह सर्व कागदपत्रे मला दिली. ते पत्र मला दाखविले ते तेच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर मुख्याधिकारी यांची सही आहे.

(आरोपी तर्फे वकील श्री. कांबळे यांनी सदर दस्तास निशाणी देण्यास हरकत घेतली व कथन केले की सदरचा साक्षीदार या कागदत्राचा ऑथर नसल्याने व पत्रावर ते मिळाल्याबाबत त्यांची सही नसल्याने त्यास निशाणी देता येणार नाही. सरकारी वकीलांनी कथन केले की सदरचे पत्र हे साक्षीदाराने पाठविलेले निशाणी ९८ कडील पत्राच्या उत्तराकरीता साक्षीदाराच्या नावे नगर परिषदेकडून देण्यात आलेले आहे. त्यामुळे साक्षीदार यांनी सदरच्या पत्राद्वारे कागदपत्रे प्राप्त केली असल्याने ते त्या पत्राबाबत साक्ष देउ शकताता, त्यामुळे या पत्रास निशाणी देणे आवश्यक आहे. पत्राचा मजकूर व ते पत्र या साक्षीदाराच्या निशाणी ९८ कडील पत्राच्या उत्तराकरीता व त्याच्या तजबीजकरीता या साक्षीदाराला तपासी अधिकारी या नात्याने पाठविले असल्याने हा साक्षीदार त्या पत्रासा प्राप्तकर्ता आहे. त्यामुळे त्या पत्रास निशाणी देणे आवश्यक आहे.) सबब त्या पत्रास **<u>निशाणी ९९</u>** देण्यात येते. या पत्राद्वारे मला पान नं. १५७ ते २०२ कडे दाखल असलेले कागदपत्र प्राप्त झाले.

२.  दि. १६.१२.२०१५ रोजी मी स्वत: नगर परिषद कार्यालय कामठी येथे गेलो तेथे उपलब्ध असलेले या प्रकरणाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्र व रजिस्टर मी पंचनाम्याने जप्त केले. मला आता निशाणी ७९ कडील पंचनामा दाखविला, तो तोच आहे. त्यावर रविंद्र पांढरे मुख्याधिकारी यांची, दोन पंच व माझी सही आहे. त्या सहया मी ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे.

३.  मी या पंचनाम्याने एम.बी. रजिस्टर जप्त केले होते. ते मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला अता एम.बी. रजिस्टर नं. २६१/७ दाखविले., ते तेच आहे, त्यास **आर्टिकल–ब** देण्यात येते. मला आता एम.बी. रजिस्टर नं.२६२/२ दाखविले, ते तेच आहे, त्यास **आर्टिकल–क** देण्यात येते. मला आता इस्टीमेट नं. ७–सी, इस्टीमेट नं. ७–ई असे लिहीलेले रजिस्टर दाखविले, ते तेच आहे, त्यावर पंचाच्या सहया आहेत, त्यास **आर्टिकल–ड** व **आर्टिकल–ई** देण्यात येते. त्यानंतर मला हॉकी बिल्डींग ते आसाराम बिल्डींग या एकाच रस्त्याचे दोन वेगवेगळे इस्टीमेट, वर्क ऑर्डर व मेजरमेंट बूक आढळले. सदरचे कागदपत्र मी जप्त केले ते आर्टिकल–ड व ई कडे आहे. तसेच मेजरमेंट दोषारोप पत्रात पान नं. ११ वर आहे.

४.  त्यानंतर आरोपी क्र. १ ते ४ यांचे नमूना हस्ताक्षर घेतले. आरोपी क्र. १ याचे हस्ताक्षर व स्वाक्षरीचे नमूने स्वततंत्र घेण्यात आले होते. त्याचा पंचनामा मी केला होता तो आता मला दाखविला तो तोच आहे, त्यावर आरोपी क्र. १, दो पंच व माझ्या सहया आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, पंचनाम्यास **निशाणी १००** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपी क्र. १ च्या नैसर्गिक स्वाक्ष–या व हस्ताक्षर नगर परिषद कामठी मधून जप्त केले. तो पंचनामा मला आता दाखविला तो तोच आहे. त्यावर दोन पंच, माझी व नगर परिषदेतील संबंधति कारकून याची सही आहे. त्या सहया मी ओळखतो. सदर पंचनाम्यास **निशाणी १०१** देण्यात येते. या पंचनाम्याप्रमाणे मी आरोपी क्र. १ त्याच्या कर्तव्याच्या ठिकाणी लिहीत असलेल्या दैनंदिन डाय–या जप्त केल्या होत्या. ते मुळ कागदपत्र मी पान क्र. १ ते १४ कडे दाखल केलेले आहे, ते तेच आहे, त्यावर आरोपी क्र. १ च्या मुळ सहया व हस्ताक्षर आहे. त्यास **आर्टिकल–फ** देण्यात येते.

५.  आरोपी क्र. १ ने हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे यांच्या घरापार्यंतच्या दुस–या रस्त्याच्या इस्टीमेटचे काम सिद्धार्थ राहाटे यांचे घर ते प्रितम उज्ञेनवार यांचे घर यामधील रस्त्यासाठी वापरून रस्ता तयार केल्याचे सांगितले होते. त्यामुळे मी नगर परिषदेकडील परिवेक्षक कुमारी अमृता नाईक व त्यांचे लिपीक यांना सोबत घेउन रहाटे ते उज्ञेनवार यांच्या घराच्या दरम्यान असलेल्या रस्त्याचे मोजमाप घेतले होते व त्याचा घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. मला आता तो पंचनामा दाखविला, तो तोच आहे, त्यावर माझी, दोन पंचांची, परिवेक्षक अमृता नाईक, व शंकर कडू कनिष्ठ लिपीक यांच्या सहया आहेत. त्या सहया मी ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी १०२** देण्यात येते.

६.  त्यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांच्याकडे पत्र देउन रहाटे ते उज्ञेनवार यांच्या घराच्या दरम्यान बांधलेला रस्ता हा इस्टीमेट प्रमाणे साहित्य वापरून तयार केलेला आहे का याच्या बाबात स्पष्टीकरण मागितले होते. त्यासाठी मी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे यांना पत्र पाठविले होते. ते पत्र मला दाखविले त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरचे पत्र दि. १४.०१.२०१६ रोजी पाठविले होते, त्या पत्रास **निशाणी १०३**

देण्यात येते. मी पाठविलेल्या पत्राप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांच्याकडून मला अहवाल सादर करण्यात आला. त्याचे पत्र मला दाखविले, ते तेच आहे, त्यावर सहाय्यक मुख्य अभियंता लिना उपाध्याय यांची सही आहे . ते पत्र मला मिळाल्याबाबत त्यावर शेरा मारला आहे. त्यास **निशाणी १०४** देण्यात येते. त्याप्रमाणे मला निशाणी ५६ कडील अहवाल देण्यात आला होता, तो तोच आहे. मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांना मी दि. २२.१२.२०१५ रोजी शिल्लक राहिलेले कागदपत्र मागणीसाठी पत्र पाठविले, त्या पत्राप्रमाणे मुख्याधिकारी यांनी मला दि.२९.१२.२०१५ रोजीच्या पत्राप्रमाणे मी मागणी केलेले कागदपत्रे मला पाठवून दिले. मी पाठविलेले पत्र मला आता दाखविले ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. दि. २२.१२.२०१५ च्या पत्रास **निशाणी १०५** देण्यात येते. नगर परिषदेकडील मुख्याधिकारी यांचे पत्र मला दाखविले ते तेच आहे त्यावर मुख्याधिकारी यांची सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, दि.२९.१२.२०१५ रोजीच्या पत्रास **निशाणी १०६** देण्यात येते.

**मध्यंतराची वेळ झाल्याने सरतपास दुपार पर्यंत तहकुब.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.05 17:00:37 +05'30'

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक ०५/०८/२०२५

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १६</u>**

**<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>**
**सरकार विरूध्द सुरेश**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**निशाणी – ९६ पुढे सुरू**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी श्रीमती जी. ओ. वर्मा यांच्या कडून**

७. दि. १२.०१.२०१६ रोजी मी आरोपी यादव व सारवे यांचे हस्ताक्षराचा नमूना पंचनाम्याने घेतला होता. त्याच पंचनाम्याने देवीदास सारवे या आरोपीची नैसर्गिक स्वाक्षरी असलेले कागदपत्र म्हणजे आयकर परताव्याचे कागदपत्र जप्त केले होते. तो पंचनामा मला दाखविण्यात आला तो तोच आहे, त्यावर माझी, पंचांची व दोनही आरोपींच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी १०७</u>** देण्यात येते. मी एका आरोपीच्या एका कागदावर सहा सहया अश्या दोनही आरोपींच्या म्हणजे यादव व सारवे यांच्या प्रत्येकी सहा कागदावर सहा सहया अश्या एकूण प्रत्येकी ३६ सहया पंचनाम्याच्या वेळी घेतल्या होत्या. त्या सहयांच्या नमून्यांचे कागद मला दाखविण्यात आले ते तेच आहे. त्या कागदपत्रांवर दोन्ही आरोपी, माझी व दोन पंचांच्या सहया आहेत.

**आरोपीच्या वकीलांनी सदर सहयांच्या नमून्यांचे कागदपत्र त्यांना दिले नसल्याने त्यांना निशाणी देता येणार नाही अशी हरकत घेतली. सरकारी वकीलांनी सहयांचे नमूने तपासणी साठी हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल व सहयांच्या नमूने त्यांनी दाखल केलेल्या अर्जाप्रमाणे थेट न्यायालयात दाखल केले असल्याचे कथन केले. तसेच आरोपींना त्याची प्रत देत असल्याचे कथन केले. सबब वर नमूद केल्याप्रमाणे कारणासाठी सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.05 17:00:42 +0530

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक ०५/०८/२०२५